गोदातीर दि. 07/10/2024

# इतवारा व हदगाव पोलिसांची कारवाई; अवैध कत्तलीसाठी जाणारे १५ गोवंश जनावरे पकडली



**नांदेड–** अवैध कत्तलीसाठी जाणारे गोवंश जातीचे पंधरा जनावरे इतवारा व हदगाव पोलिसांनी पकडले आहेत. पोलीसांच्या या कारवाईमुळे मुक्या प्राण्यांचा जीव वाचला आहे.

शहरासह जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनानुसार ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत चालू असलेल्या अवैध व्यवसायांवर कारवाया केल्या जात आहेत. मागील काळात एका धार्मीक सणानिमित्ताने त्यांनी विविध ठिकाणी गोवंश जातीच्या जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या होत्या.

दि. ५ ऑक्टोबर रोजी अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. यावरुन इतवारा पोलिसांनी बाफना–देगलूर नाका रस्त्यावर (एम एच २२ ए.एन.०९३८) व (एमएच २६ बीइ ४१३४) ही दोन वाहने पकडून त्यातील ९ लाख रुपयांच्या आठ जनावरांना जीवदान दिले आहे. दुसऱ्या घटनेत हदगाव पोलिसांनी शहरानजीक असलेल्या उमरखेड टी पॉईंटजवळ (एमएच २८ बीबी २२२१) या वाहनातून कत्तलीसाठी जाणाऱ्या दहा गायी पकडल्या. या प्रकरणी इतवारा व हदगाव पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.